
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER – 2017

# कथात्मक साहित्यातील आर्थिक जीवन




प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

मानवी जीवनाच्या विशाल समूहावर साकारणारे हे साहित्यप्रकार मराठी साहित्याच्या क्षेत्रात विशिष्ट नावा रुपाला येऊ लागले. मानवी जीवनाला समग्रतेने साकारणारे हे साहित्य समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक जीवनाचे स्तर अतिशय कलात्मकतेने साकार करु लागले. साहित्याचा आणि समाजाचा संबंध अशा विविधांगी जीवनचित्रणातून लक्षवेधी स्वरुपात कसाकार होऊ लागला. लेखक त्या समाजजीवनाचाच एक घटक असल्याने समाजात जीवन जगत असताना आलेल्या अनुभवांना तो आपल्या कल्पकतेने आणि प्रतिभाशक्तीने शब्दगोचर करु लागला.

साहित्य अकादमी ही साहित्य क्षेत्राला प्रोत्साहित आणि प्रेरणा देणारी एक मोठी संस्था आज वर्तमान स्थितीतही साहित्याला उभारी देत आहे. याच साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन गौरविलेल्या कथात्मक साहित्यातील आर्थिक जीवनाचित्रणाचे स्वरुप विवेकाधिष्ठत भूमिकेतून विस्तृत प्रमाणात विचारात घेता येईल.

## प्रास्ताविकः

अर्वाचिन मराठी वाङमयाच्या क्षेत्रात कथात्मक साहित्याचे योगदान अतुलनीय आणि वेधक आहे. या काळात मोठया प्रमाणात कथात्मक साहित्याची निर्मिती झाल्याचे दिसून येते. प्रारंभी भाषांतराच्या रुपाने अविष्कृत होणारे मराठी साहित्य पुढे पुढे स्वतंत्ररित्या निर्माण होऊ लागले. समाजाच्या कक्षा जशा-जशा विस्तारु लागल्या तस-तसे मराठी साहित्य विस्तार पाऊ लागले. समाजाच्या वेगवेगळया क्षेत्रातून साहित्याची निर्मिती होऊ लागली. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाने समाजात लेखन प्रवृत्ती बळावत गेली आणि स्वतंत्र मराठी साहित्य लेखनाचे एक युग निर्माण झाले.

फडके, खांडेकरांनी आणि समकालीन लेखकांनी वेगवेगळया प्रकारात आपल्या अनुभवांना साकार करुन मराठी साहित्याच्या प्रवाहात मोलाची भर टाकली. साहित्याचा हा आलेख असाच उंचावत ठेवण्यासाठी पुढे वेगवेगळया संस्थांनी पुढाकार घेतला. साहित्य निर्मितीला प्रेरणा मिळावी म्हणून साहित्याच क्षेत्रात वेगवेगळे पुरस्कार देण्यात येऊ लागले. परिणामतः साहित्य लेखनाची प्रेरणा वाढीस लागून समाजाच्या विविध क्षेत्रातील लोक आपल्या जीवनानुभवांना शब्दबध्द करु लागले. साहित्याच्या परिघापासून अलिप्त असणाऱ्या जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण साहिततून मोठया प्रमाणात होऊ लागले. लेखक आपल्या अनुभवांना कथा आणि कांदबरीच्या स्वरुपात साकार करु लागले.

## आर्थिक जीवनः

मराठी कादंबरीच्या कक्षा विस्तारणारे एक महत्वाचे साहित्यक असणारे वि.स.खांडेकर होय. खांडेकरांच्या 'ययाति' या कादंबरीला मराठी वाङमयाच्या क्षेत्रातील साहित्य अकादमीचा पहिला पुरस्कार मिळाला. खांडेकरांनी 'ययाति' कादंबरीतून पौराणिक जीवनाचे चित्र रेखाटले आहे. 'ययाति' राजाच्या जीवनाची शोकांतिका विषद करताना खांडेकरांनी मानवी समाजजीवनातील विविधता स्पष्ट केली आहे. खांडेकरांची प्रतिभा 'ययाति' च्या जीवनकाहाणीतून वेगवेगळया मानवी मनोवृत्तीचा शोध घेते. तसेच या मनोवृत्तीभोवती फिरणाऱ्या सामाजिक, राजकी, धार्मिक, आर्थिक जीवनाचे स्तरही साकार करते.

'ययाति' राजाच्या जीवनाची कहाणी कथन करतानाच वि.स.खांडेकर त्यांच्या सभोवतालचे जीवनाचे चित्र रंगवून मानवी समाजातील विविध घटना-प्रसंगांचा आढावा घेतात. 'ययाति' राजाच्या जीवनाचे चित्रण साकारताना त्यांच्या राज्यात असणारे आर्थिक समाजजीवन कशा पध्दतीचे होते ते पहावयास मिळते.

एकूण मानवी समाज 'अर्थ' या संकल्पनेभोवती स्थिरावलेला आहे. अर्थाला मानवी समाजात माणसाच्या जगण्यात अनन्यसाधारण महत्व आहे. माणसाच्या जगण्याची इर्षा या अर्थाभोवती गुंफली गेलेली आहे. मानवी समाजातील सर्वश्रेष्ठापासून ते कनिष्ठापर्यंत सगळयांचेच जगणे 'अर्थ'या संकल्पनेत बंदिस्त झाल्याने लेखकाने मानवी समाज जीवनाला साकार केले असले तरी या सामाजिक जीवनाचे एक अंग बनून आर्थिक जीवनाचे विविध स्तर कथा, कादंबऱ्यातून चित्रित झाल्याचे पहावयास मिळते.

'रथचक्र' ही श्री.ना.पेंडसे यांची ग्रामीण जीवनाचे संदर्भ घेऊन साकारणारी कादंबरी मानवी जीवनातील वैविध्याला अतिशय वास्तवपूर्णतेने साकारते पेंडसे यांनी मानवी समाजजीवनाचे चित्र रेखाटताना मानवी समाजात असणाऱ्या आर्थिक जीवनाचे स्तर स्पष्ट केले आहेत. 'रथचक्र' ही कादंबरी अनेक कारणासाठी गाजलेली कादंबरी आहे. ही कादंबरी श्री.ना.पेंडसेचीही आवडती कादंबरी आहे. 'माझ्या कादंबऱ्यापुरतं बोलायचं तर रथचक्र ही माझी सर्वात यशस्वी कादंबरी असं मी मानतो. सुदैवाने तिची उपेक्षा झाली नाही' असे पेंडसे यांनी आपल्या कादंबरीविषयी म्हटले आहे.

'स्वामी' या कादंबरीतून रणजीत देसाई यांनी ऐतिहासिक जीवनावर प्रकाश टाकला आहे. 'स्वामी' कादंबरी श्रीमंत माधवराव पेशवे यांच्या जीवनप्रवाहाला अतिशय सखोलतेने साकार करते. इतिहासाशी इमान राखत प्रवाही राहणारे कादंबरीचे कथानक माधवरावांच्या ऐतिहासिक जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक स्तर अतिशय प्रभावीपणे रेखाटते. माधवराव पेशव्यांचे ऐतिहासिक व्यक्तिमत्व सिध्द करणारी प्रस्तुत कादंबरी मराठी समीक्षेच्या परिघात विशेषच चर्चिली गेल्याचे पहावयास मिळते. 'स्वामी' ने ऐतिहासिक कादंबरीच्या परंपरेत स्वतंत्र युग निर्माण केले. ऐतिहासिक कादंबरीमध्ये ती एक सन्मान बिंदू ठरली.

मराठी साहित्य विश्वातील एका मोठा अवकाश व्यापणारे, बहुअयामित्व लाभलेले एक थोर साहित्यिक म्हणजे पु.ल.देशपांडे होय. पु.ल.च्या 'व्यक्ति आणि वल्ली' या व्यक्तिचित्रण संग्रहाने मराठी साहित्याला मानवी मनोवृत्तीचे विराट दर्शन घडविले आहे. वेगवेगळया स्वभावृत्तींच्या व्यक्तिचित्रणाला पु.ल.नीआपल्या प्रतिभाशक्तीने शब्दरुप दिले आहे. या व्यक्तिचित्रणाला साकारताना देशपांडे यांनी मानवी जीवनातील विविधता दर्शविली आहे. मानवी समाजजीवनाचाच एक भाग असणाऱ्या आर्थिक जीवनालाही पु.ल.नी काही व्यक्तिचित्रणाच्या रुपाने साकार केले आहे.

पु.ल.देशपांडे यांनी मानवी वृत्ती-प्रवृत्तीला अगदी जवळून न्याहाळले आहे. मानवी जीवनाला अगदी संवेदनशीलतेतून आणि विनोदाचे सहाय्याने पु.ल.नी आपल्या लेखनातून वाचकांपर्यंत पोहचविले आहे. व्यक्ती आणि वल्ली मधून ज्या वेगवेगळया व्यक्तिरेखा साकारलेल्या आहेत. त्यातील नामू परीट ही व्यक्तिरेखा आपल्या चरित्रार्थ चालविण्यासाठी कशा पध्दतीने खटपट करीत असते. नामूच्या आर्थीक परिस्थितीला शब्दबध्द करताना ते म्हणतात," नामूने अनेक मॉबसीनमध्ये कामे केली आहेत. कुठ पानवाल्याच्या गिऱ्हाईकांच्या घोळक्यात, थेटरातल्या ऑडियन्समध्ये कुणाचा तरी धुवायला आलेलो सूट घालून, ऐतिहासिक चित्रपटात 'हरहर महादेव'करीत हातात ढाल तलवार घेऊन नामू हजर आहे. निर्मातादेखील एका एक्स्ट्राचे पैसे वाचले म्हणून खुश ! हा नामू म्हणजे मला एक कोडे आहे. इतका कोडगा माणूस मी अजून पाहिला नाही. कपडे एका विशिष्ट वारी आणून दिले आहे असे कधी झालेच नाही." पु.ल.देशपांडे यांनी नामू परीट आपल्या आर्थिक परिस्थितीला सावरण्यासाठी कसा जीवाचा आटापिटा करतो ते प्रत्ययकारितीने चित्रित केले आहे.

जी.ए.कुलकर्णी यांनी आपल्या कथालेखनाने मानवी समाजजीवनाच्या तळाचा शोध घेतला आहे. माणसाच्या जगण्याच्या पलिकडचे जगणे साकारणाऱ्या जी.ए. कुलर्णी यांच्या कथा माणसाच्या जगण्याचे अनेक पदर उलघडून दाखविणाऱ्या आहेत. या कथालेखनातून मानवी जीवनाचा विस्तृत आलेख कुलकर्णींनी रेखाटला आहे.

जी.ए. च्या 'काजळमाया' कथासंग्रहातून सामाजिक वास्तववादी कथा तसेच प्रतिकात्मक तत्वज्ञानात्मक अशा स्वरुपांच्या कथा आल्याचे दिसून येते. या कथासंग्रहातून मानवी जीवनातील नियतीवादाचे प्रतिबिंब उमटल्याचे ठळकपणे जाणवते. जी.ए.च्या जीवनदृष्टीतून साकारलेल्या कथा त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलू स्पष्ट करतात. जी.एं.ची जीवनदृष्टी त्यांच्या लेखनातून दिसून येते. त्यांची जीवनदृष्टी गंभीर, अंतर्मुख करणारी आणि चिंतनशील बनविणारी आहे. साहित्य, कला, तत्वज्ञानहे त्यांच्या चिंतनाचे आवडीचे विषय आहेत. मानवी जीवनातील महत्वपूर्ण प्रश्नांचा विचार गंभीरपणे अंतर्मुख करणे याचा ह्यांना ध्यास आहे. जी.एं.च्या कथांचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यांच्या वैविध्य संपन्नतेविषयी डॉ.द.भि.कुलकर्णी नेमकेपणाने सांगतात," जी.ए.कुलकर्णी हा मराठीतील एक असामन्य प्रतिभेचा अलौकिक कलावंत आहे. त्याच्या निर्मितीचा जितक्या वेगवेगळया अंगाने आपण विचार करु तितकी आपल्याअभिरुचीला संपन्नता येणार आहे. उदा.जी.ए. यांच्या प्रतिमासृष्टींचा विचार केला तर अलंकार, प्रतिमा, प्रतीक, मिथ्यकथा यांच्यातील साम्यभेदाचे आपले आकलन सहज समृध्द होत जाते ; जी.ए. यांच्या निर्मिती प्रक्रियेचा विचार केला तर निर्मिती प्रक्रियेतील आवेग कलाकृतीला कसे सामर्थ्य मिळवून देतो याचा आपणास बोध होईल, जी.ए. यांचा जितक्या अंगाने अभ्यास करावा तितक्या अंगाने आपण विदग्ध होत जातो." डॉ.द.भि.कुलकर्णी यांनी जी.ए.च्या कथा कशा पध्दतीने वैविध्यसंपन्न होत जातात ते सांगून त्या वेगवेगळया अंगांनी अभ्यासाला गेल्या तर त्यांच्या कथांनी आपण विदग्ध कसे होतो ते लक्षात येते.

'स्मरणगाथा' या आत्मचरित्रात्मक कादंबरीतून गो.नि.दांडेकर यांनी आपल्या जीवनाचे कथन केले आहे. दांडेकरांनी आपल्या जन्मापासूनच्या जीवनाचा इतिहास सांगितला आहे. आपल्या जीवनातील विविध घटना प्रसंगाचे शब्दरुप साकार केले आहे. दांडेकरांनी आपल्या जीवनाचा विविधांगी आलेख रेखाटताना समाजातील सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवनाचे स्तर अगदी

प्रत्ययकारीतेने उभे केले आहेत. दांडेकर आपल्या जीवनाची स्मरणसाखळी गुंफताना दांडेकरांनी आर्थिक जीवनाचेही चित्रण अगदी नेमकेपणाने केले आहे. दांडेकरांच्या अनुभवाची प्रामाणिक अभिव्यक्ती म्हणजे दांडेकरांची 'स्मरणगाथा' होय.

'सत्तांतर' या व्यंकटेश माडगुळकरांच्या कादंबरीने साहित्याच्या क्षेत्रात मराठी कादंबरीला सर्वदूर पोहचविले. व्यंकटेश माडगुळकरांनी मोजकी पण मौलिक, वेगळी आणि कसदार वाङ्मयनिर्मिती केली आहे. नवकथाकार आहेत. लेखनाला अतिशय कसदार बनविणारे कथानक आपल्या कादंबरी लेखनात विचारात घेऊन माडगुळकरांनी मानवी जीवनाचा वेध अतिशय प्रभावीपणे घेतला आहे.

विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांच्या प्रश्नांना आपल्या 'झाडाझडती' या कादंबरीतून साकारले आहे. विश्वास पाटलांची ही कादंबरी आधुनिक मराठी कादंबरीच्या विश्वाला एक मोठी देणगी ठरली आहे. धरणग्रस्ताच्या प्रश्नांना आधोरेखित करताना विश्वास पाटील मानवी समाज जीवनातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक जीवनाचे विविध स्तर अगदी सखोलतेने आणि प्रत्ययकारितेने चितारले आहे. मानवी समाजजीवनातील आर्थिक जीवनचित्रणाला विश्वास पाटलांनी झाडाझडतीमधून अगदी वास्तवपूर्ण स्वरुपात चित्रित केले आहे.

नामदेव कांबळे यांनी आपल्या कादंबरीतून 'वालंबी' नावाच्या मांग जमातीतील स्त्रीजीवनाची शोकात्म कहाणी कथन केली आहे. कांबळे यांच्या या कथानकाला सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक जीवनाचे विविध स्तर असे वेगवेगळे पदर निर्माण झाले आहेत. नामदेव कांबळे आपल्या या कादंबरी लेखनाने ग्रामीण जीवनवास्तवाला सरळसरळ सामोरे जातात. वसारी आणि डोंगर किन्ही या दोन गावच्या भोवती प्रामुख्याने कथनकाची मांडणी केली आहे. गावातील विविध स्तरातील माणसे त्यांचे जगणे हे सारे अनेक पातळयावरुन मांडले आहे.

रघु या कादंबरीचा नायक आहे तो आपल्या परिस्थितीशी झगडत आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी धडपडतो आहे. दोन वेळच्या पोटभर जवेणाची भ्रमंती असणारा हा रघु जिद्दीने शिक्षण घेत राहतो. सृष्टीत मोलमजुरीची कामे करुन तो पैसे जमवित असतो. मिळेल ते आणि पडेल ते कष्टाचे काम करुन तो आपल्या आईवरचा खर्चाचा भार कमी करीत असतो. त्यांच्या जगण्यातून, त्याच्या परिस्थितीतून त्याला व्यावहारिक शहाणपण आल्याचे जाणीव होते. रघु, वालंबी, सीताराम यांची ही संघर्षकथा कशी साकार होते ते चंद्रकांत बांदिवडेकर यांनी नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, "वालंबी, सीताराम, रघू यांची कुटुंबकथाही रघूच्या शिक्षणाच्या समस्येतून निर्माण झालेल्या प्रसंगांनी अधिक समृध्द केली आहे. रघूच्या शाळेतल्या वातावरणात ढुंगणावर फाटलेल्या पटवरुन निर्माण झालेल्या प्रसंगातही विलखण कारुण्य भरलेलं आहे. एखादा सोनकरसारखा शिक्षक रघूच्या समस्या सोडवतो, एखादा बालकासारखा माणुसकीहीन मास्तर विद्यार्थ्यांच्या जीवनाश क्रुर खेळ खेणाराही असतो आणि काही शिक्षक नेकीने शिकविणारेही असतात."[१६] बांदिवडेकर यांनी रधूच्या आर्थिक परिस्थितीवर भाष्य करताना त्याला या परिस्थितीत शिक्षणासाठी भाष्य करताना त्याला या परिस्थितीत शिक्षणासाठी मदत करणारे शिक्षकही कसे महत्वाचे होते. ते स्पष्ट केले आहे.

रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' ही कादंबरी प्रामुख्याने राजकीय जीवनाच्या चित्रणाला आधोरेखित करणारी दिर्घ कादंबरी आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या सामाजिक जीवनाचा वेध घेणारे आजच्या पिढीतील एक महत्वाचे कादंबरीकार म्हणून पठारे यांचा उल्लेख केला जातो. मानवी जीवनाचे विधिांगी चित्रण पठारे यांनी आपल्या कादंबरी लेखनातून साकारले आहे. 'ताम्रपट' मधून पठारे यांनी ीारतीय राजकीय जीवनाचे वास्तवदर्शी चित्र रेखाटले आहे. या राजकीय जीवनाचे चित्रण करतानाच मानवी जीवन समूहातील आर्थिक जीवनचेही दर्शन पठारे घडवितात.

राजन गवस यांनी कविता, कथा, कादंबरी या वाङमयप्रकारात सातत्याने दर्जेदार लेखन केले आहे. आपल्या साहित्यलेखनात गवस यांनी प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकला आहे. आपल्या लेखनातून गवस यांनी मानवी जीववनातील विविध समस्यांवर प्रकाश टाकला आहे. तसेच त्यांनी ग्रामीण समाजात जीवन जगण्याच्या वाटयाला येणाऱ्या प्रश्नांचीही नेमकेपणाने दखल घेतली आहे. गवस यांच्या साहित्यविश्वातील एक परिणाकारक आणि लक्षवेधक कादंबरी म्हणजे 'तणकट' ही कादंबरी होय. ग्रामीण जीवनाच्या राजकारणातील मूल्यभ्रष्टता साकारणारी ही कादंबरी मानवी जीवनातील दलित समाजाच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक जीवनालाही तेवढयाच ताकदीनी सामोरे आणते. ग्रामीण जीवनात सहकारी संस्थेचे जाळ कसे विणले जात आहे. त्याचा फायदा प्रारंभी सर्वसामान्यांना झालाही मात्र पुढे यात भ्रष्ट व्यवहारी माणसांची घुसखोरी वाढत गेली आणि सामान्स माणूस शोषणाला बळी कसा पडत गेला ते 'तणकट' अतिशय वास्तवदर्शी स्वरुपात रेखाटते.

'डांगोरा एका नगरीचा' ही त्र्य.वि.सरदेशमुख यांची साईखेड संस्थानच्या ऐतिहासिक जीवनचित्रणाला प्रतिबिंबीत करणारी एक महत्वपूर्ण कादंबरी आहे. सरदेशमुख यांनी या संस्थानच्या इतिहासाला रेखाटताना या संस्थानातील सामाजिक जीवनाचे विविधांगी आणि प्रभावी चित्रण केले आहे. या संस्थानाच्या जीवनाचे चित्रण करताना सरदेशमुख यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनावर भाष्य केले आहे. रघूवीर सिंहाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या या संस्थानातील लोकांच्या जगण्याचे चित्रण आर्थिक जीवनाच्या संदर्भाने रेखाटल्याचे अनुभवास येते.

पारंपारिक शेती आणि शिक्षण घेऊन बेकार बनलेला ग्रामीण तरुण हा जेव्हा शेती करायला लागतो, तेव्हा उद्‌भवलेल्या आर्थिक जीवन परिस्थितीला देशमुखांनी चित्रित केले आहे. सामाजिक जीवन चित्रणाला रेखाटताना सदानंद देशमुख यांनी त्या समाजातील आर्थिक जीवनाचेही नेमकेपणाने चित्रण केले आहे. शेतकऱ्यांची मुले उच्चशिक्षण घेऊन बाहेर पडतात. त्यानंतर त्यांना शिक्षणक्षेत्रातील नोकरीच्या

ठिकाणी डोनेशनसाठी अडकुन रहावे लागते. वर्षाकाठी शेतीमधून आपला उदरनिर्वाह भागविण्यापुरतेच उत्पन्न निघत असल्याने त्याला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. नोकरीच्या प्रयत्नात असणाऱ्या या तरुणाला स्वतःच्या जगण्याची भ्रांत असताना तो लाख, दोन लाख रुपये डोनेशसाठी देऊ शकत नाही. उच्च शिक्षित असूनही डोनेशन देऊ शकत नसल्याने ते तरुण बेकार राहतात. परिणामी, या भ्रष्ट व्यवस्थेपुढे आणि आर्थिक संकटांच्या साखळीत बंदिस्त जीवन या तरुण पिढीला जगावे लागते. ते 'बारोमास' मध्ये अनुभवास येते.

## सारांश :

अशाप्रकारे सरतेशेवटी सारांश रुपाने सांगता येते की, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्यकातील आर्थिक जीवनाचा वेध घेत असताना असे जाणवते की, या साहित्यकृती त्या त्या काळातील जीवनाचे वास्तवपूर्ण चित्रण रेखाटण्यात अत्यंत यशस्वी झाल्या आहेत. भारतीय सामाजिक जीवनाचे वैविध्यपूर्ण चित्रण साकारणाऱ्या या कालाकृती समाजजीवनातील आर्थिक स्थितीगतीच्या लेखाजोखा तेवढयाच ताकदीने साकार करतात. भारतीय समाजजीवनात अर्थव्यवस्थेचे असणारे विविधांगी स्वरुप या साहित्यकृतीतून लेखकांनी प्रभावीपणे मांडले आहे. सामाजिक जीवनात होत जाणाऱ्या बदलाबरोबर त्या समाजातील आर्थिक जीवनातही कसा आमुलाग्र बदल होत होता ते प्रत्ययास येते.

वर्तमान समाजजीवनाची आर्थिक स्थिती गतीबरोबरच ऐतिहासिक, पौराणिक कालखंडातील आर्थिक जीवनाचे चित्रण अनुभवायास मिळते. भारतीय समाज जीवनात अर्थ व्यवस्थेचे असणारे विविध स्तर रेखाटनाच लेखकांनी स्वतंत्र्य प्राप्तीनंतर समाजात झालेल्या आर्थिक जीवनातील बदलालाही स्पष्ट केले आहे. या आर्थिक जीवनातील स्वार्थी भ्रष्ट मनोवृत्तीवरही काही साहित्यकृतीतून लेखक प्रकाश टाकतात. एकूण भारतीय समाजव्यवस्था आर्थिक जीवनाच प्रवाहात कशी वाहत चालली आहे याचे विलोभनीय चित्रण बदलत्या काळानुरुप साहित्यकृतीतून होत गेल्याची जाणीव होते.

## निष्कर्ष

समाज आणि अर्थ यांचा सहसंबंध स्पष्ट करुन आर्थिक जीवन हे कोणत्याही साहित्यकृतीतील एक महत्वाचा घटक असल्याने त्याचे चित्रण साहित्यकृतीतून होणे अगत्याचे वाटते. शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील लोकजीवनाचे आर्थिक जीवन प्रस्तुत कलाकृतीतून कसे स्पष्ट झाले आहे ते स्पष्ट केले आहे.

- पुरस्कार प्राप्त कलाकृतीतून साकारणारे आर्थिक जीवन स्वातंत्र्यपूर्व काळातील आर्थिक परिस्थितीचा तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक जीवनांगाचा मनोवेधक आणि वास्तवपूर्ण वेध घेऊन समाजातील आर्थिक जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडविते.
- या कालखंडातून साकारणारे आर्थिक जीवन मानवी समाजाच्या बदलत्या प्रवाहाबरोबर कसे बदलत गेले ते स्पष्ट करते. तसेच जागतिक पातळीवर घडणाऱ्या घटना या आर्थिक जीवनाला कशा प्रतिबिंबित करतात ते स्पष्ट होते.
- पुरस्कार प्राप्त कथानात्मक काही कलाकृतीतून समाजातील वेगवेगळया आर्थिक स्तराचे विलोभनीय दर्शन घडते. या स्तरावर या आर्थिक घडामोडींचा परिणाम होऊन या स्तरातील लोकांच्या जगण्याला कशी वेगळी परिमाणे प्राप्त होतात ते ही लक्षात येते.
- या पुरस्कार प्राप्त कथात्मक कलाकृतीतून साकारणारे राजकीय जीवनाचे चित्रण कलाकृतीला पूर्णत्व प्राप्त करुन देणाऱ्या अनेकविध रिकाम्या जागा भरणारे आणि कालाकृतीच्या गुणात्मकतेत मोलाची भर घालणारे आहे. अशा महत्वपूर्ण आणि कलाकृतीला पूर्णत्व देणाऱ्या घटकांगामुळेच ती कलाकृती अकादमीचे निकषास सार्थ ठरते आणि म्हणूनच ती पुरस्काराने सन्मानित होते ते स्पष्ट होते.

## संदर्भ सूची

१. डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वि.आ.ऑक्टोंबर १९९६, पृ.७६.
२. वसंत आबाजी डहाके, गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, संपा.विलास खोले लोकवाङमयगृह मुंबई, द्वि.आ.जुलै २००७, पृ.१०८.
३. प्रा.स.ग.मालशे, स्वामी - एक शोध, संपा.प्रस्तावना डॉ.मीरा घाडगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ.जाने.२००१, पृ.३४.
४. रणजित देसाई, संचित, निवडक अध्यक्षीय भाषणे संपा.पांडूरंग कुंभार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ.ऑगस्ट २००१ पृ.१२.
५. चंद्रकांत बांदिवडेकर, देशीवाण, अक्षर प्रकाशन, मुंबई, प्र.आ.मार्च २००२, पृ.क्र.१२०.
६. पु.ल.देशपांडे, व्यक्ती आणि वल्ली, मौज प्रकाशन गृह मुंबई, आडतिसावी आ. एप्रिल २०१२ पृ.२१
७. पु.ल.देशपांडे, तत्रैव पृ.क्र.४४
८. डॉ.द.भि.कुलकर्णी, जीएंची महाकथा, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्र.आ.१७ जुलै २००८ पृ.२३.
९. डॉ.द.भि.कुलकर्णी, तत्रैव पान ७०
**१०.** गो.नि.दांडेकर, स्मरणगाथा, मॅजेस्टिक बुक स्टॉल मुंबई, प्र.आ.८ जुलै १९७३ पृ.क्र.१८०.